**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.01.2025** **वार- शनिवार**

---

**गुइलेन बॅरे सिंड्रोम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात गुइलेन बॅरे सिंड्रोम आजाराचं निदान झालेल्या 64 वर्षीय महिलेचा मंगळवारी मृत्यू झाला. या महिलेचं निधन न्यूमोनियानं झालं असल्याचं रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉक्टर राजेंद्र वाबळे यांनी सांगितलं. शहरामध्ये या आजाराचे तेरा रुग्ण आढळले असून सहा रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. सहा रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**जीबी सिंड्रोम**

पुणे आणि परिसरात जीबी सिंड्रोमची बाधा झालेले आतापर्यंत 73 रुग्ण आढळून आले आहेत. यामध्ये 47 पुरुष आणि 26 महिलांचा समावेश आहे. यातील काही रुग्णांचे लघवी आणि रक्ताचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. यामध्ये ‘कॅम्पायलो बॅक्टर जेजुनी’ या जीवाणू आणि ‘नोरो व्हायरस’ या विषाणूमुळं दुर्मिळ ‘जीबीएस’ची बाधा झाल्याचं आता उघड झालं आहे. या दोन्हींचा संसर्ग दूषित अन्न अथवा पाण्यातून होतो. याचबरोबर या दोन्हींची लक्षणंही पोटदुखी, उलट्या आणि जुलाब ही आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि उघड्यावरील कोणतंही अन्न खाऊ नये. तसंच पाणी उकळून प्यावं, असं आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आलं आहे.

**विश्व मराठी**

पुण्यात 30 जानेवारी रोजी होणारं विश्व मराठी संमेलन शासनातर्फे आयोजित असलं तरी ते तितकंच पुणेकरांचं देखील आहे. त्यामुळं पुणेकरांनी त्यात सहभाग घ्यावा असं आवाहन

मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केलं. सकाळी अकरा वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत या संमेलनाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. मराठी भाषा साता समुद्रापार नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या ज्येष्ठ लेखकाला साहित्य भूषण पुरस्कार देण्याचं निश्चित करण्यात आलं असून या पुरस्काराचा पहिला मान मधु मंगेश कर्णिक यांना देण्यात येणार आहे. युवा लेखक, कलाकार आणि कवी यांच्या दृष्टीनं देखील कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे अशी माहिती सामंत यांनी दिली.

**'मतदार जागृती दिन**

फर्ग्युसन महाविद्यालयात आज 'मतदार जागृती दिन' साजरा करण्यात आला. लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान करण्याची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. महाविद्यालयाच्या परिसरात जनजागृती करण्यासाठी प्रबोधन फेरी काढण्यात आली.

**झेंडा-भूरा**

प्रजासत्ताक दिनानिमित्त घरीदारी, वाहनांसाठी घेतले जाणारे राष्ट्रध्वज नंतर इतस्ततः रस्त्यावर, कचऱ्यात पडून त्यांचा अवमान होऊ नये म्हणून भारत फ्लॅग फाऊंडेशननं पुढाकार घेतला आहे. असे ध्वज भारत फ्लॅग फाऊंडेशन, मुरुडकर झेंडेवाले, पासोडया मारूती मंदिरासमोर, बुधवार पेठ इथं जमा करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ निमित्त डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आलं होतं.विकिपिडीयावर मराठी साहित्य वाचणाऱ्याची संख्या वाढायला हवी, अशी अपेक्षा या साहित्य संमेलनात सहभागी झालेल्या साहित्यिकांकडून व्यक्त करण्यात आली.

**व्हीआयपी स्वच्छतागृह**

पुणे महापालिका शहराच्या प्रवेशद्वारांवर अत्याधुनिक वातानुकूलित सात व्हीआयपी स्वच्छतागृह उभारणार आहे. त्यासाठी महापालिकेनं प्रस्ताव मागविले आहेत. एका स्वच्छतागृहासाठी 50 लाख रूपये खर्च येणार आहे.

**मेट्रोचे ट्रान्झिट कार्ड**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पुणे मेट्रोचे ट्रान्झिट कार्ड पहिल्या पाच हजार प्रवाशांसाठी 20 रुपयांत उपलब्ध होणार आहे. या कार्डमुळे प्रवाशांना सोमवार ते शुक्रवार 10 टक्के आणि शनिवार  रविवार 30 टक्के सवलत मिळणार आहे अशी माहिती पुणे मेट्रो प्रशासनानं दिली आहे.

**एम्प्रेस गार्डन पुष्प प्रदर्शन**

द ॲग्री - हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडियाच्या पुढाकारानं एम्प्रेस गार्डन पुष्प प्रदर्शनाचं उद्घाटन राज्याचे भूमि अभिलेख संचालक डॉक्टर सुहास दिवसे यांच्या हस्ते करण्यात आलं. 27 जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात पुण्यासह कोल्हापूर, सांगली, नाशिक, आंध्र प्रदेश आणि देशातील अनेक रोपवाटिका व्यवसायिकांनी भाग घेतला आहे.

**खो-खो**

पहिल्या खो-खो विश्व करंडक स्पर्धेत विजेतेपदाची अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या विजयी संघातील खेळाडूंचं पुण्यात आगमन झाल्यानंतर फेरीद्वारे जोरदार स्वागत करण्यात आलं. आमदार हेमंत रासने यांनी पुरुष संघाचा कर्णधार प्रतीक वाईकर, खेळाडू सुयश गरगटे, आदित्य गणपुले, पुरुष संघाचे प्रशिक्षक शिरीन गोडबोले, महिला संघाच्या प्रशिक्षिका प्राची वाईकर यांचा सत्कार करत अभिनंदन केलं.

**खो-खो**

खो खो विश्वचषक मिळाल्यामुळं या खेळाला वलय आणि भवितव्य प्राप्त झालं आहे तसंच महाराष्ट्र शासन खेळाडूंच्या पाठीशी ठामपणे उभं राहिलं. अनेक राज्यं महाराष्ट्र शासनाचं अनुकरण करत असून भविष्यात हा खेळ अधिक वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा खो-खो

विश्वचषक विजेत्या संघाचे कर्णधार प्रतीक वायकर आणि प्रियांका इंगळे यांनी आज पुण्यात व्यक्त केली. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं या दोघांचा सत्कार अध्यक्ष सुमित भावे यांच्या हस्ते करण्यात आला त्यानंतर  वाईकर आणि इंगळे यांनी मनोगत व्यक्त केलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**